महाराष्ट्र शासन
कृषि विभाग
मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (SMART) प्रकल्प
प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्ष - राज्यस्तर
शेती महामंडळ बिल्डींग, २७० भांबुर्डा, सेनापती बापट मार्ग, सिंबॉयसीस कॉलेज जवळ, पुणे-४११०१६
फोन नं.०२०-२५६५६५७७ / ७८, ई-मेल-pcmu.smart@gmail.com, वेबसाईट-www.smart-mh.org

जा. क्र. स्मार्ट/पीसीएमयु/तक्रार / ५६३ /२०२६ दि. २१/०४/२०२६

प्रति,

संचालक ,
कृपीचंद्रमा शेतकरी उत्पादक कंपनी लिमिटेड,
ममदापूर, ता. अंबाजोगाई, जि. बीड.

विषय: GRM प्रणालीवर प्राप्त SMART_०००००००५९ तक्रारबाबत.

संदर्भ : १.पीसीएमयू MIS प्रणालीवर प्राप्त तक्रार SMART_०००००००५९.

२.या कार्यालयाचे पत्र जा.क्र./स्मार्ट/GRM तक्रार/३३६/२०२६, दि. २६/०२/२०२६.

३.नोडल अधिकारी, विभागीय अंमलबजावणी कक्ष, छत्रपती संभाजीनगर स्मार्ट प्रकल्प यांचे पत्र जा.क्र./ वि.अ.क./स्मार्ट /GRM तक्रार /२३६/२०२६ , दि. १३/०३ /२०२६.

४. या कार्यालयाचा दि. २८/०३/२०२६ रोजीचा प्रकल्प अंमलबजावणी कक्ष व्हीएसटीएफ यांना ईमेल.

५ . प्रकल्प अंमलबजावणी कक्ष व्हीएसटीएफ, स्मार्ट प्रकल्प यांचे पत्र -जा.क्र./स्मार्ट/ पीआययू व्हीएसटीएफ /GRM /तक्रार/१७५/२०२६ , दि. ३१/०३/२०२६.

उपरोक्त संदर्भान्वाये प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने विभागीय अंमलबजावणी कक्ष, स्मार्ट प्रकल्प, छत्रपती संभाजीनगर यांच्या प्राप्त पत्रान्वये संदर्भ क्र. ३ अन्वये कळविले आहे कि, बीड जिल्ह्यातील कृषीचंद्रमा शेतकरी उत्पादक कंपनी लिमिटेड ही व्हीएसटीएफ प्रकल्प अंमलबजावणी कक्ष यांची असून GRM प्रणालीवर आलेल्या तक्रारीचे अवलोकन केले असता सदर तक्रार मोघम स्वरूपाची असल्याचे निदर्शनास येऊन त्यामध्ये नेमके कोणत्या व्यक्ती विरुद्ध तक्रार केली आहे, याबाबत स्पष्टता होत नाही. तसेच संबंधित समुदाय आधारित संस्थेचे संपादन व्यतिरिक्त इतर सर्व कामे ही जिल्हा अंमलबजावणी कक्ष व्हीएसटीएफ व प्रकल्प अंमलबजावणी कक्ष व्हीएसटीएफ यांच्यामार्फत होत असून या स्तरावर त्यांचे कोणतेही संपादन विषयक प्रकरण प्रलंबित नाही.

तसेच संदर्भ क्र. ४ अन्वये प्रकल्प अंमलबजावणी कक्ष व्हीएसटीएफ यांना सदरील प्रकरणाबाबत विचारणा केली असता संदर्भ क्र. ५ अन्वये प्राप्त पत्रान्वये कळविले आहे कि, सदर तक्रार मोघम स्वरूपाची असल्याचे निदर्शनास येऊन त्यामध्ये नेमके कोणा व्यक्ती विरुद्ध तक्रार केली आहे, याबाबत स्पष्टता होत नाही. कृषीचंद्रमा शेतकरी उत्पादक कंपनी लिमिटेड सिबिओला राज्यस्तरीय उपप्रकल्प मंजुरी समिती १५ वी सभा दि. २७.०६.२०२२ रोजी मंजुरी देण्यात आलेली आहे. त्यानुसार सीबीओचे Construction of Warehouse

(२००० MT) व Construction of Processing Unit Shed (१३१ sq.mt.) याचे काम पूर्ण झालेले आहे. संबंधित समुदाय आधारित संस्थेचे संपादन व्यतिरिक्त इतर सर्व कामे ही जिल्हा अंमलबजावणी कक्ष, बीड व प्रकल्प अंमलबजावणी कक्ष - व्हीएसटीएफ यांच्यामार्फत होत असून या स्तरावर त्यांचे कोणतेही संपादन विषयक प्रकरण प्रलंबित नाही.

नोडल अधिकारी, विभागीय अंमलबजावणी कक्ष, स्मार्ट प्रकल्प, छत्रपती संभाजीनगर यांचे कृषीचंद्रमा शेतकरी उत्पादक कंपनी बाबत DG Set १२५ KVA ऐवजी ५८.८ KVA खरेदीच्या संपादन प्रक्रियेस कार्योत्तर मान्यता मिळणेबाबतचे पत्र या कार्यालयास प्राप्त झालेले होते. त्यानुसार कृषीचंद्रमा ॲग्रो शेतकरी उत्पादक कंपनी लि., ममदापूर, ता. अंबाजोगाई, जि. बीड या सीबीओस DG Set १२५ KVA ऐवजी ५८.८ KVA खरेदीच्या संपादन प्रक्रियेस कार्योत्तर मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर सीबीओस जिल्हास्तर , विभागस्तर व पीआययु व्हीएसटीएफ स्तरावरून उप-प्रकल्प संबंधित बाबीवर वेळोवेळी मार्गदर्शन करण्यात आलेचे दिसून येते . सदरच्या सीबीओ चे प्रकल्प अंमलबजावणी कक्ष - व्हीएसटीएफ स्तारावरती कोणतेही काम प्रलंबित नाही. सदर तक्रार मोघम स्वरूपाची असल्याने निदर्शनास येऊन त्यामध्ये नेमके कोणा व्यक्ती विरुद्ध तक्रार केली आहे, याबाबत स्पष्टता होत नाही यामुळे सदरची तक्रार निकाली काढण्यात येत आहे .

21/4/26

(उदय देशमुख)
अतिरिक्त प्रकल्प संचालक ,
स्मार्ट प्रकल्प पुणे

प्रत : माहितीस्तव व कार्यवाहीस्तव

१. नोडल अधिकारी , विभागीय अंमलबजावणी कक्ष, छ. संभाजीनगर.

२. नोडल अधिकारी , प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, (कृषी) स्मार्ट प्रकल्प पुणे.

महाराष्ट्र शासन
कृषि विभाग
मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (SMART) प्रकल्प
विभागीय अंमबजावणी कक्ष, छत्रपती संभाजीनगर
कार्यालय:- विभागीय कृषि सह संचालक, छत्रपती संभाजीनगर,
चेतना मंगल कार्यालय (रामायणा कल्चरल हॉल), ओंकारेश्वर चौक, उल्कानगरी, छत्रपती संभाजीगर – ४३१००९
दुरध्वनी क्रमांक : ०२४०-२३३१०९४ ई मेल :

जा.क्र./वि.अ.क./स्मार्ट/ GRM तक्रार/236/२६ दिनांक :-१३ /०३/२०२६

प्रति,

मा.अतिरिक्त प्रकल्प संचालक,

प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्ष,

स्मार्ट प्रकल्प, पुणे .

**विषय-** बीड जिल्ह्यातील सिबिओच्या GRM प्रालीवर आलेल्या तक्रारीचे निवारण करणेबाबत ....

**संदर्भ-** आपले पत्र जा.क्र.स्मार्ट / GRM तक्रार /३३६/२०२६ दि.२६/०२/२०२६

उपरोक्त संदर्भीय विषयानुसार सविनय सादर करण्यात येते की, बीड जिल्ह्यातील कृषीचंद्रमा शेतकरी उत्पादक कंपनी ही VSTF प्रकल्प अंमलबजावणी कक्ष यांची असून GRM प्रणालीवर आलेल्या तक्रारीचे अवलोकन केले असता सदर तक्रार मोघम स्वरूपाची असल्याचे निदर्शनास येऊन त्यामध्ये नेमके कोणा व्यक्ती विरुद्ध तक्रार केली आहे, याबाबत स्पष्टता होत नाही. तसेच संबंधित समुदाय आधारित संस्थेचे संपादन व्यतिरिक्त इतर सर्व कामे ही जिल्हा अंमलबजावणी कक्ष VSTF व प्रकल्प अंमलबजावणी कक्ष VSTF यांच्यामार्फत होत असून या स्तरावर त्यांचे कोणतेही संपादन विषयक प्रकरण प्रलंबित नाही.

करिता माहिती सविनय सादर.

13/03/2026

(माधुरी सोनवणे)
नोडल अधिकारी
विभागीय अंमलबजावणी कक्ष, स्मार्ट प्रकल्प
छत्रपती संभाजीनगर.

**प्रत,** मा.प्रमुख, प्रकल्प अंमलबजावणी कक्ष-कृषि, स्मार्ट प्रकल्प तथा संचालक (आत्मा), कृषि आयुक्तालय, पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.

13/03/2026

(माधुरी सोनवणे)
नोडल अधिकारी
विभागीय अंमलबजावणी कक्ष, स्मार्ट प्रकल्प
छत्रपती संभाजीनगर.

मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प
प्रकल्प अंमलबजावणी कक्ष- ग्राम सामाजिक परिवर्तन प्रतिष्ठान
(जागतिक बँक अर्थ सहाय्यित)
नों. कार्यालय: ग्राम विकास भवन ,प्लॉट नं. ७६अ ,सेक्टर-२१ ,खारघर नवी मुंबई - ४१०२१०
शाखा कार्यालय: २१ C-मित्तल टॉवर ,नरीमन पॉईंट ,मुंबई- ४०००२१

SMART
महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन प्रतिष्ठान

जा.क्र./स्मार्ट/पीआययु-व्हीएसटीएफ/GRM तक्रार/१७५/२०२६ दि. ३१/०३/२०२६

प्रति,

मा. अतिरिक्त प्रकल्प संचालक,
प्रकल्प समन्वयक व व्यवस्थापन कक्ष,
मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (SMART) प्रकल्प, पुणे

विषय: बीड जिल्ह्यातील सीबीओच्या GRM प्रणालीवर आलेल्या तक्रारीचे निवारण करणेबाबत...

संदर्भ: १. नोडल अधिकारी, विभागीय अंमलबजावणी कक्ष, स्मार्ट प्रकल्प, छत्रपती संभाजीनगर यांचे पत्र - जा.क्र./स्मार्ट/सीबीओ/कृषीचंद्रमा/ डीजी सेट/५९२/२०२५, दि. १०/१०/२०२५
२. या कार्यालयाचे पत्र - जा.क्र./स्मार्ट.पीआययु- व्हीएसटीएफ/सीबीओ-कृषीचंद्रमा/का. मान्यता/५४५/२०२५, दि. ३१/१२/२०२५
३. पीसीएमयु कार्यालयाकडून ई-मेल द्वारे प्राप्त सूचनेनुसार

उपरोक्त विषयानुसार सविनय सादर करण्यात येते की, बीड जिल्ह्यातील कृषीचंद्रमा ॲग्रो शेतकरी उत्पादक कंपनी लि., ममदापूर, ता. अंबाजोगाई, जि. बीड ही सीबीओ प्रकल्प अंमलबजावणी कक्ष - व्हीएसटीएफ अंतर्गत कार्यरत असून GRM प्रणालीवर आलेल्या तक्रारीचे अवलोकन केले असता सदर तक्रार मोघम स्वरूपाची असल्याचे निदर्शनास येऊन त्यामध्ये नेमके कोणा व्यक्ती विरुद्ध तक्रार केली आहे, याबाबत स्पष्टता होत नाही. कृषीचंद्रमा सीबीओ ला राज्यस्तरीय उपप्रकल्प मंजुरी समिती १५ वी सभा दि. २७.०६.२०२२ रोजी मंजुरी देण्यात आलेली आहे. त्यानुसार सीबीओचे Construction of Warehouse (२००० MT) व Construction of Processing Unit Shed (१३१ sq.mt.) याचे काम पूर्ण झालेले आहे. संबंधित समुदाय आधारित संस्थेचे संपादन व्यतिरिक्त इतर सर्व कामे ही जिल्हा अंमलबजावणी कक्ष, बीड व प्रकल्प अंमलबजावणी कक्ष - व्हीएसटीएफ यांच्यामार्फत होत असून या स्तरावर त्यांचे कोणतेही संपादन विषयक प्रकरण प्रलंबित नाही.

कृषीचंद्रमा सीबीओ ने मंजूर उपप्रकल्प मधील DG Set १२५KVA ऐवजी ५८.८ KVA खरेदीची संपादन प्रक्रिया पूर्व संमती न घेता केलेली आहे. सदर सीबीओ ने नोडल अधिकारी, जिल्हा अंमलबजावणी कक्ष, बीड यांना DG Set १२५ KVA ऐवजी ५८.८ KVA सुधारित मंजुरी मिळणेबाबत विनंती केलेली होती. संदर्भ क्र. १ अन्वये नोडल अधिकारी, विभागीय अंमलबजावणी कक्ष, स्मार्ट प्रकल्प, छत्रपती संभाजीनगर यांचे कृषीचंद्रमा सीबीओ बाबत DG Set १२५ KVA ऐवजी ५८.८ KVA खरेदीच्या संपादन प्रक्रियेस कार्योत्तर मान्यता मिळणेबाबतचे पत्र या कार्यालयास प्राप्त झालेले होते. संदर्भ क्र. २ नुसार कृषीचंद्रमा ॲग्रो शेतकरी उत्पादक

कंपनी लि., ममदापूर, ता. अंबाजोगाई, जि. बीड या सीबीओस DG Set १२५ KVA ऐवजी ५८.८ KVA खरेदीच्या संपादन प्रक्रियेस कार्योत्तर मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर सीबीओस जिल्हा, विभागीय व पीआययु स्तरावरून प्रकल्प संबंधित वेळोवेळी मार्गदर्शन करण्यात आलेले आहे. सदरच्या सीबीओ चे प्रकल्प अंमलबजावणी कक्ष - व्हीएसटीएफ स्तरावरती कोणतेही काम प्रलंबित नाही.

करिता माहिती सविनय सादर.

नोडल अधिकारी
प्रमुख, प्रकल्प अंमलबजावणी कक्ष-
व्हीएसटीएफ, स्मार्ट प्रकल्प